| CNR No.MHPU130017422022 | नियमित दिवाणी दावा क्र. ३८२/२०२२ |
|---|---|
| | अनुसया नारायण जगदाळे व इतर<br>विरुद्ध<br>वत्सलाबाई कुंभारकर व इतर |

## निशाणी क्र.६४ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र.२ ते ४ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २२ नियम ३ अन्वये मयत वादी क्र.१ अनुसया नारायण जगदाळे यांच्या कायदेशीर वारसांना अभिलेखावर आणण्याची परवानगी मिळण्यासाठी सादर केलेला आहे. अर्जामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, वादी क्र.१ अनुसया नारायण जगदाळे यांचे दि.२३.०७.२०२५ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात (अ) किसन नारायण जगदाळे, (ब) राजेंद्र नारायण जगदाळे, (क) लीला वामन फडतरे व (ड) कमल भानुदास ढोणे हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. या वारसां व्यतिरिक्त मयत अनुसया नारायण जगदाळे यांना अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे, सदर वारसांना मयत वादी क्र.१ यांच्या जागी अभिलेखावर समाविष्ट करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादींनी लेखी म्हणणे दाखल करून विरोध केला आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुत अर्ज कायद्यानुसार ग्राह्य धरण्याजोगा नाही. अर्जामध्ये आवश्यक व पर्याप्त कारणांचा अभाव असून, अर्ज केवळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. अर्ज, त्यासोबतची कागदपत्रे तसेच दोन्ही पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेतला. अभिलेखावरून असे निर्विवादपणे दिसून येते की, वादी क्र.१ अनुसया नारायण जगदाळे यांचे दि.२३.०७.२०२५ रोजी निधन झाले असून, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखात निशाणी क्र.६७/१ खाली दाखल केले आहे. प्रतिवादींनी देखील मयत अनुसया नारायण जगदाळे यांच्या मृत्यूच्या घटनेबाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. यापूर्वीच्या आदेशान्वये मयत वादी क्र.१ यांच्या विरुद्ध दावा अवसानात गेल्यानंतर तो आदेश रद्द करण्यासाठी झालेला विलंब न्यायालयाने माफ केलेला आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्जामध्ये विचाराधीन प्रश्न केवळ एवढाच आहे की, अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यक्ती या मयत अनुसया नारायण जगदाळे यांच्या

कायदेशीर वारस आहेत काय. अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यक्ती (अ) किसन नारायण जगदाळे, (ब) राजेंद्र नारायण जगदाळे, (क) लीला वामन फडतरे आणि (ड) कमल भानुदास ढोणे या मयत अनुसया नारायण जगदाळे यांच्या कायदेशीर वारस नाहीत, असा कोणताही विशिष्ट आक्षेप प्रतिवादींनी त्यांच्या लेखी म्हणण्यात घेतलेला नाही. तसेच, वादींनी केलेल्या कथनास खोडून काढणारा कोणताही दस्तऐवजी अथवा इतर पुरावा प्रतिवादींकडून अभिलेखावर सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत, अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे व दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांचा विचार करता, अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यक्तिंना मयत वादी क्र.१ अनुसया नारायण जगदाळे यांचे कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर आणण्याची परवानगी देणे न्यायोचित व योग्य ठरेल. म्हणून खालीलप्रमाणे आदेशः

## आदेश

१. निशाणी क्र.६४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.२ ते ४ यांना मयत वादी क्र.१ अनुसया नारायण जगदाळे यांच्या जागी अर्जात नमुदप्रमाणे कायदेशीर वारसांना अभिलेखावर आणण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादींनी पुढील तारखेपर्यंत आवश्यक ती दुरुस्ती करून सुधारित वादपत्र तसेच सुधारित कारणशीर्षक न्यायालयात दाखल करावे.

SHINDE SATISH GANESHRAO
Digitally signed by SHINDE SATISH GANESHRAO
Date: 2026.07.30 15:47:47 +0530

( सतीश ग. शिंदे )

स्थळः– सासवड. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

दि.३०.०७.२०२६ सासवड, जि. पुणे.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर कथन करतो की, या आदेशाच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुरांशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :: | संतोष किशनराव पांचाळ, लघुलेखक(श्रेणी–III) |
| **न्यायालयाचे नाव** | :: | **श्री. सतीश ग. शिंदे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड, जि. पुणे. |
| आदेशाची तारीख | :: | ३०/०७/२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | :: | ३०/०७/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | ३०/०७/२०२६ |